8-1-2020 - दै. लोकमत

# 'कर्तव्य सोशल'तर्फे सायकलचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : कर्तव्य सोशल ग्रुपच्यावतीने सात अपंग व्यक्तींना नवीन तीनचाकी सायकल आणि व्हिलचेअरचे वाटप वेदांतिकाराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य शिवाजीराव चव्हाण, कर्तव्य सोशल ग्रुपचे सदस्य विलास कासार, सुहास ओहाळकर, महेश यादव, डी. पी. शेख, रवी पवार, सुनील भोसले, ओंकार परदेशी, चंदन घोडके आदी उपस्थित होते.

यावेळी अनिल साठे, बाळू ओव्हाळ, दुर्योधन बाबर, रवींद्र बोर्डे, ओमकार भिसे, संजय देवरे आणि लक्ष्मण मुळीक या दिव्यांग बांधवांना मोफत तीनचाकी सायकल, व्हिलचेअर भेट देण्यात आली. दिव्यांगांचे जीवन सुसह्य व्हावे, त्यांच्या दैनंदिन कामकाजात त्यांना मदत मिळावी, यासाठी सायकल आणि व्हिलचेअरचे मोफत वाटप केले जाते, असे वेदांतिकाराजे यांनी सांगितले.